नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 19/10/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## विनयभंग

पो.स्टे. सावेनरः— दिनांक 01/09/2021 चे 00.00 वा. ते दिनांक 18/10/2021 चे 18.00 वा. दरम्यान 20 वर्षीय फिर्यादी/पीडित ही सप्टेंबर 2021 ते दि. 18/10/2021 रोजी पावेतो आरोपी नामे— सत्येन्द्र केदार दोहरे वय 23 वर्ष रा. माईन स्टोन बोरूजवाडा वार्ड क्र. 2 सावनेर याने फेसबुक वरून फिर्यादीशी मैत्री करून तिला वारंवार भेटण्यासाठी बोलावू लागला. फिर्यादी यांनी आरोपीशी असलेली मैत्री तोडून टाकून "माझ्याशी कोणतेही संबध ठेवायचे नाही" असे सांगितले असतांनाही त्याने फिर्यादीच्या फोनवर वारंवार फोन करून व मॅसेज करून तिला भेटण्यासाठी बोलावीत होता. त्यावेळी त्याच्या त्रासाला कंटाळुन फिर्यादी ही तक्रार देण्यासाठी पो स्टे ला येत असतांना आरोपीने रस्त्यात फिर्यादीस थांबवून समजूत घालून गाडीवर बसवून बोरूजवाडा हायवे रोडवर घेवून जावून त्या ठिकानी फिर्यादीस "तु माझ्या विरूद्ध तक्रार का देते व माझ्या सोबत बोलत का नाही" असे म्हणून फिर्यादीस त्यांची एकत्र असलेली फोटो प्रसारीत करन्याची व मारन्याची धमकी दिली. फिर्यादी हिने आरोपीस भेटण्यास नकार दिला असता घरी जावून लग्न करन्याची मागनी करून तिच्या मागे लागला असता फिर्यादी हिने लग्नास स्पष्टपणे नकार दिला असता तो पुन्हा वारंवार फोन करून मॅसेज करून फिर्यादीस त्रास देवू लागला. फिर्यादी हिने त्याचे मोबाईल फोन रिसीव्ह केले नाही म्हणुन आरोपी हा फिर्यादी चे घरी गेला असता त्यास पकळून ते पो स्टे ला तक्रार देन्यासाठी येत असतांना रस्त्यातच आरोपी व त्याची आई यांनी माफी मागून एक वेळेस माफ करा असे सांगून यापुढे फिर्यादी यांना कोणतेही मॅसेज करणार नाही तसेच पाठलाग करणार नाही. अशी नोटरी करून देवूनही आरोपीने मॅसेज करने सुरू ठेवले व त्रास देने सुरू ठेवले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 ए, 354 डी, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार तिवारी 9689891486 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. बेला :— अंतर्गत 08 कि.मी. अंतरावरील सोनेगाव ते मोहगाव रोडवर येथे दि. 18/10/2021 चे 06.00 वा. पूर्वी आकाश गजानन गेडाम(मृतक) वय 24 वर्ष रा. पहेलानपूर ता.वर्धा हा सोनेगाव ते मोहगाव कडे जानारे रोडनी पायदळ जात असतांनी अज्ञात चारचाकी वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक दिली. या अपघातात मृतकाचे डोक्यावरून चाक गेल्यामुळे मृतक हा अपघातामध्ये गंभीररित्या जखमी होवुन जागीच मरण पावला व वाहन चालक आपले वाहनासह पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रकाश गजानन गेडाम, वय 24 वर्ष, रा. पहेलानपूर ता.वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठेंगणे 8972812569 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 4 किमी. अंतरावरील सिंदेवानी येथे दिनांक 13/10/2021 चे 08.30 वा. दरम्यान सौ. कांता पुरेन कोडवते वय 36 वर्ष रा. सिंदेवानी हिने अज्ञात कारणातुन आपल्या राहाते घरी अज्ञात कारणाने विषारी औषध प्राषण केले. तिची प्रकृती खराब झाल्याने उपचार कामी मिला प्रथम ग्रामीण रूग्णालय देवलापार व नंतर मेडिकल कॉलेज नागपुर येथे दि. 13/10/21 चे 14.55 वा भरती केले असता उपचार दरम्यान तेथील डॉक्टरांनी दि 17/10/2021 चे 13.00 वा दरम्यान मृत घोषीत केले. सदर मृतकाचे मरण्याचे कागदपत्र पोस्टे ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विलास बेलसरे मेडिकल पोलिस बुथ, नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस पोलिस नाईक नलगुंडवार मो. क्र. 9923701697 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर